# प्रेस नोट

## <u>आपले सरकार सेवा केंद्राबाबत जाहिरात</u>

महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग, शासन निर्णय क्र. मातंसं-१७१६/प्र.क्र. ५१७/३९ दि. १९ जानेवारी २०१८ अन्वये महाराष्ट्र राज्यात सध्या कार्यरत असलेली सर्व महा ई सेवा केंद्रे, सेतु सुविधा केंद्रे, नागरी सुविधा केंद्रे तसेच संग्राम केंद्रे यांना "आपले सरकार सेवा केंद्र" हे नाव देऊन सर्व कॉमन सर्व्हीस सेंटरचे एकसारखे ब्रँडिंग करणेत येत आहे. आपले सरकार सेवा केंद्र यांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळावर सोपविण्यात आलेली आहे. या शासन निर्णयांतर्गत प्रत्येक ग्रामपंचायत क्षेत्रात एक आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करण्यात येईल. मात्र ५००० पेक्षा अधिक लोकसंख्या (२०११ च्या जनगणनेनुसार) असलेल्या ग्राम पंचायतीत किमान २ केंद्रे स्थापन करण्यात येईल. शहरी भागासाठी आपले सरकार केंद्रासाठी महानगरपालिका व नगरपरिषद - १०००० लोकसंख्येसाठी एक केंद्र, प्रत्येक नगरपंचायत क्षेत्रात किमान एक केंद्र स्थापन करण्यात येईल, मात्र ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या नगर पंचायतीत किमान २ केंद्रे स्थापन करण्यात येईल. सध्या रिक्त असलेल्या आपले सरकार सेवा केंद्रांची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या www.kolhapur.gov.in या वेबसाईट वर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. रिक्त असलेल्या आपले सरकार सेवा केंद्रासाठी इच्छुक नागरिंकानी वरील संकेत स्थळावरून अर्जाचा नमुना डाऊनलोड करून सदरचे अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह **<u>३१ जुलै २०१८</u>** पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर यांचेकडे सादर करावेत.